महाराष्ट्र शासन

क्रमांक:- संकीर्ण २०२०/प्र.क्र. २००/आस्था-५
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक:- १३ एप्रिल, २०२०

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय:- शासकीय निधी राष्ट्रीयकृत बँकेमध्येच ठेवणेबाबत.**

**संदर्भ:**- वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५/
दि. १३ मार्च, २०२०

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५, दि. १३ मार्च, २०२० (प्रत संलग्न) अन्वये सर्व शासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे इत्यादींनी त्यांच्याकडील सर्व बँकींगविषयक व्यवहार राष्ट्रीयकृत बँकेमार्फतच पार पाडण्यासाठी यापूर्वी खाजगी अथवा सहकारी क्षेत्रातील बँकांमध्ये असलेले खाते बंद करुन केवळ राष्ट्रीयकृत बँकेतच खाते उघडणेबाबत सूचना दिल्या आहेत.

२. तरी, संदर्भाधीन शासन निर्णयातील सूचना विचारात घेऊन आपल्या अखत्यारितील सर्व कार्यालयांचे आर्थिक व्यवहार केवळ राष्ट्रीयकृत बँकेमार्फतच होतील याबाबत सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरुन तातडीने सूचना द्याव्यात, ही विनंती.

आपला

(ए. का. गागरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी , ग्रामविकास विभाग, मंत्रालय,मुंबई
२) अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
३) क.अ.आस्था-५,ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

Scanned with CamScanner